# सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी वॉरियर क्लब

धुळे(वा) श्री.शि.वि.प्र. संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयाच्या संगणक विभागाचा क्विक हिल फाउंडेशनसोबत सायबर सुरक्षा जनजागृती करण्यासाठी सामंजस्य करार झालेला आहे. याअंतर्गत सायबर वॉरियर क्लबची स्थापना करून ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर तसेच क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. या क्लबचे उद्घाटन सीएमसीएस कॉलेज नासिक येथे पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात




आले.

या सोहळ्यासाठी क्विक हिल फाउंडेशनचे सहयोगी व्यवस्थापक अजय शिर्के तसेच सीएसआर एक्झिक्युटिव्ह श्रीमती सुगंधा दाणे व सीएमसीएस महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.शेलार उपस्थित होते. याप्रसंगी अजय शिर्के यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर जनजागृतीबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती अनुपमा यांनी क्विक हिल कंपनीचे संस्थापक कैलाश काटकर यांच्या जीवनपटविषयी सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

निवड झालेले ३० विद्यार्थी हे प्रा. स्वाती बोरसे यांच्यासोबत धुळे जिल्ह्यातील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून सायबर गुन्ह्यांविषयी जागृती करतील. हे गुन्हे टाळण्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे याबद्दलही मार्गदर्शन करतील.